# बी.ए. भाग – 2

## पेपर नं.5

# भारतीय समाजाचे परिवर्तन

## प्रकरण पहिले – भारतीय समाजाचे बदलते स्वरूप

### आदिम समाजातील परिवर्तन :

शतकानुशतके भारतीय समाजाच्या मुख्य प्रवाहापासून दूर, दुर्गम भागात व निसर्ग सान्निध्यात वास्तव्य करणाऱ्या आदिवासींची अलगता ब्रिटिश राजवटीत संपली. त्यांचा प्रगत लोकांशी घनिष्ट संपर्क येऊ लागला. स्वातंत्र्यानंतर आदिवासींना समाजाच्या मुख्य प्रवाहात सामिल करण्याच्या उद्‌देशाने आदिवासी कल्याणाचे विविध कार्यक्रम शासन, सेवाभावी व्यक्ती व संघटनांनी सुरू केले. आदिम क्षेत्रात शेती विकास, उद्योगधंदे, शिक्षणसंस्था, आरोग्यकेंद्रे, रस्ते, रेल्वे, पोस्ट, तारायंत्र, आकाशवाणी, दुरदर्शन अशा सोयीसुविधा पुरविण्यात येऊ लागल्या. या सर्व घटकाच्या प्रभावामुळे आदिम समाजाच्या जीवनाच्या सर्व क्षेत्रात परिवर्तन घडून येऊ लागले. त्या परिवर्तनाचे स्वरूप पुढीलप्रमाणे आहे.

### अ) आर्थिक क्षेत्रातील बदल :

**1) आर्थिक क्रियांमध्ये बदल :** पूर्वी खाद्यसंकलन, शिकार–मासेमारी, स्थानांतरीत शेती अशा आर्थिक क्रिया करणारे आदिवासी आज औद्योगिक क्षेत्रात अकुशल, अर्धकुशल, कुशल कामगार म्हणून मोठ्या प्रमाणावर काम करू लागले आहेत. आदिवासी क्षेत्रात मोठमोठे उद्योगधंदे सुरू झाल्यावर आदिवासींनी आपल्या खेड्यांतून, औद्योगिक नागरी क्षेत्राकडे रोजगारासाठी स्थलांतर केले.

**2) शेती व्यवसायातील बदल :** बहुसंख्य आदिवासी झुम, दाही, बदलती कुऱ्हाड शेती, स्थानांतरित शेती या नावाने ओळखली जाणारी अप्रगत शेती करीत. या शेतीपध्दतीत मौल्यवान जंगल संपत्तीचा विनाश होई. जमिनीची धूपही मोठ्या प्रमाणावर होई

आणि अत्यंत अपुरे व निकृष्ट प्रतीचे धान्योत्पादन होई. अशा या नुकसानकारक शेतीपध्दतीवर शासनाने बंदी घातली आहे.

**3) कुटिरोद्योग व जोडधंद्याा विकास :** आदिवासींच्या आर्थिक विकासासाठी शासनाने व स्वयंसेवी संस्थांनी आदिम क्षेत्रात कुटिरोद्योग व जोडधंदे यांना चालना दिली. त्यासाठी आदिवासींना कर्ज, अनुदान, प्रशिक्षण, मार्गदर्शन, उत्पादीत मालाची विक्री व्यवस्था अशा सोयी पुरविल्या जातात.

**4) वेठबिगार प्रथेला प्रतिबंध :** प्रगत समाजातील जमीनदार, सावकार, व्यापारी इत्यादी धनाढ्य मंडळी आदिवासींना वेठीस धरून सक्तीने, विना मोबदल्यात किंवा अल्प मोबदल्यात किंवा कर्जाच्या फेडीसाठी घरगडी व शेतमजूर म्हणून राबवून घेत.

**5) नव्या संस्थाचा उदय :** परंपरागत आदिम अर्थव्यवस्थेत नसलेल्या अनेक आर्थिक संस्था उदा.बँका, बाजारपेठा, पतसंस्था, गुदामे, खरेदी–विक्री केंद्रे इ. आदिवासी क्षेत्रात उदयास आल्या आहेत. त्यामध्ये सहकारी तत्वावरील संस्थांचा भरणा अधिक आहे वरील सर्व घटकांमुळे आदिम आर्थिक जीवनात लक्षणीय बदल झाले आहेत.

**ब) सामाजिक क्षेत्रातील बदल :**

**1) कुटुंबसंस्थेतील बदल :** आदिम कुटुंबाच्या रचनेत व कार्यात बदल होत आहेत. कुटुंबप्रमुखाच्या अधिकारांचा ऱ्हास होत आहे. इतर सदस्यांनाही हक्क व स्वातंत्र्य काही प्रमाणात मिळू लागले आहे. संयुक्तकुटुंबाचे विघटन होऊन त्या जागी विभक्त कुटुंब स्थापन करण्याची प्रवृत्ती हळूहळू वाढत आहे.

**2) विवाहसंस्थेतील बदल :** कुटुंबाप्रमाणेच आदिम विवाहसंस्थेतही बदल होत आहेत. ख्रिश्चन धर्म स्वीकारलेल्या नागा, मिझो इ. जमातींनी ख्रिश्चन विवाहपध्दती स्वीकारली आहे. तर हिंदुच्या संपर्कात आलेल्या भिल्ल, गोंड, महादेव कोळी, ठाकूर,

वारली या जमातींनी हिंदुपध्दतीत बालविवाह, हुंडाप्रथा, ब्राम्हणाकडून विवाहमुहुर्त पाहणे, विवाहप्रसंगी धार्मिक विधी करणे इत्यादी गोष्टींचा स्वीकार केला आहे.

**3) कुलसंघटनेत बदल :** संघटनात्मक दृष्टीने कुटुंबाखालोखाल कुलास आदिम समाजात महत्व होते. कुलसदस्य परस्परांना रक्तसंबंधी मानत असल्याने त्यांच्यात आत्मीयतेची व सहकार्याची भावना असे. आज ही भावना कमी होत आहे. कुल, कुलाचार, कुलप्रथा, कुलाची इभ्रत, कुलप्रतिक (देवक) इत्यादीचा प्रभाव ओसरत चालला आहे.

**4) युवागृहांचा ऱ्हास :** संरक्षण, लैंगिक व व्यावसायिक शिक्षण, व्यक्तिमत्व विकास, संस्कृती संक्रमण अशी महत्वपूर्ण कार्ये करणाऱ्या युवागृहांचा ऱ्हास झाला आहे. युवागृहात रात्री जाणे, नाचणे, गाणे, तेथे लैंगिक ज्ञान मिळविणे, तेथेच विवाहाचा जोडीदार निवडणे या गोष्टींची लाज आदिवासी तरूण–तरूणींना वाटू लागली आहे.

**5) सामाजिक दर्जा निर्धारण पध्दतीतील बदल :** पूर्वी जन्म, वय, दैवी शक्तींवरील नियंत्रण, शारीरिक शक्ती या निकषांच्या आधारे जमात प्रमुख, वृध्दजन, जादूगार, भगत, योध्दा यांचा सामाजिक दर्जा श्रेष्ठ मानला जाई. त्यांना समाजात प्रतिष्ठा असे.

**क) राजकीय क्षेत्रातील बदल :**

**1) जमात प्रमुख व पंचायतीचे अधिकार नष्ट :** आदिवासींच्या राजकीय जीवनातही परिवर्तन घडून आले आहे. पूर्वी आदिम जमातीत जमात प्रमुख व जमात पंचायत जमातीचा कारभार चालवित. संरक्षण, शांतता व सुव्यवस्था, सामाजिक नियंत्रण, न्यायदान इत्यादी कार्ये जमात प्रमुख पंचायतीच्या मार्गदर्शनाखाली करीत असे.

**2) राजकीय प्रक्रियेची सुरूवात :** स्वातंत्र्यानंतर आदिवासींनाही इतर भारतीयांप्रमाणेच समान नागरिकत्व संविधानाने दिले. लोकशाहीत आदिवासींनाही राजकीय सत्तेत

सहभाग मिळावा म्हणून केंद्रीय व राज्य विधीमंडळात त्यांच्यासाठी लोकसंख्येच्या प्रमाणात राखीव जागा ठेवल्या.

**3) दबाव गटांचा उदय :** शिक्षण प्रसारामुळे राजकीय व सामाजिक जागृती निर्माण होऊन आपले हितसंबंध साध्य करण्यासाठी आदिवासी संस्था, संघटना, राजकीय पक्ष, दबावगट स्थापन करून आंदोलने सुरू करू लागले आहेत.

**4) नेतृत्वात बदल :** आदिम नेतृत्वातही बदल झाला आहे. जमात प्रमुख, मांत्रिक, भगत, पंचायत सदस्य अशा परंपरागत नेतृत्वाची जागा सुशिक्षित व लोकशाही पध्दतीचे नेतृत्व (उदा.सरपंच, विधीमंडळ सदस्य) घेऊ लागले आहेत.

**ड) शिक्षण क्षेत्रातील बदल :**

**1) शिक्षण प्रसार :** आदिमांच्या शिक्षणपध्दतीत बदल घडून आले आहेत. पूर्वी आदिवासी मुलांना जीवनावश्यक शिक्षण कुटुंबातून व युवागृहातून मिळत असे. व्यावसायिक शिक्षणाचे धडे मुले वडिलधाऱ्या मंडळींच्या हाताखाली घेत असत.

**2) नव्या जगाची ओळख :** सुशिक्षित आदिवासींना प्रगत जमातीतील ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, कल्पना, मते, मूल्ये यांची ओळख होत आहे. त्यामुळे त्यांच्या अंधश्रध्दा, देवभोळ्या समजुती, जादूटोणा, मंत्रतंत्र, भुतप्रेत इत्यादीवरील विश्वास कमी होत आहे. सुशिक्षित आदिवासींच्या सवयीत, मनोवृत्तीत, दृष्टिकोनात व जीवनपध्दतीत बदल होत आहे.

**इ) धार्मिक क्षेत्रातील बदल :**

**1) ख्रिश्चन धर्माचा स्वीकार :** आदिवासींच्या परंपरागत धर्मश्रध्दा व धर्माचरणातही बदल घडून आले आहेत. ब्रिटिश राजवटीत ख्रिश्चन धर्म प्रसारकांनी भारतातील आदिवासींचे धर्मांतर घडवून आणले.

**2) हिंदुकरण :** हिंदू धर्म प्रसारकांनीही आदिवासींमध्ये धर्मप्रसार केल्याने अनेक जमातींचे हिंदुकरण घडून आले आहे. बहुतेक आदिम जमातींचे शेजारी हिंदुच असल्याने फार पूर्वीपासून आदिम जमातींनी संस्कृतीकरणाच्या प्रक्रियेद्वारे हिंदुच्या धर्मश्रध्दा व धर्माचरणाचा स्वीकार केल्याचे आढळून येते.

**3) इस्लाम व बौध्द धर्मांचा प्रभाव :** कांही जमातीवर इस्लाम व बौध्द धर्माचा प्रभाव पडला आहे. उत्तर–पश्चिम हिमालय भागातील 'गुजर' पाकसीमेलगतच्या राजस्थानच्या भागातील भिल्ल व लक्षद्विप बेटावरील आदिवासी यांच्यावर इस्लामधर्माचा प्रभाव पडला आहे.

**4) धर्माचा प्रभाव ओसरला :** शिक्षणप्रसार, विज्ञान व तंत्रज्ञानाचा वाढता प्रभाव यामुळे आदिम जीवनावरील धर्माची असलेली पकड आज सैल होत आहे. आजारपणात मांत्रिक व भगत यांची मदत घेणारे आदिवासी वैद्यकीय उपचाराकडे वळू लागले आहेत.

**फ) सांस्कृतिक क्षेत्रातील बदल :**

**1) वेशभूषा व केशभूषा यातील बदल :** पूर्वी नग्न–अर्धनग्न अवस्थेत राहणारे आदिवासी प्रगत समाजाच्या संपर्कामुळे पूर्ण पोशाख करू लागले. त्यामुळे ऊनवारा, पाऊस, थंडी यापासून त्यांचे शरीरसंरक्षण होऊ लागले. तथापि पोषाखामुळे कांही समस्या उद्‌भवल्या आहेत.

**2) खाण्यापिण्याच्या पध्दतीत बदल :** पूर्वी कांही जमाती फळे, कंदमुळे, कृमीकीटक, कच्चे मांस खात. आज यामध्ये बदल होत आहे. औद्योगिक– नागरी क्षेत्राच्या संपर्कातील आदिवासींनी प्रगत लोकांच्या खाण्यापिण्याच्या पध्दतीचा अंगिकार केला आहे.

**3) निवासस्थानाच्या स्वरूपात बदल :** पूर्वी तंबूत किंवा मातीच्या घरात, बांबू व गवताच्या झोपडीत राहणारे आदिवासी आज घरबांधणीसाठी दगड, वाळू, विटा, कौले, सिमेंट वापरू लागले आहेत.

**4) भाषेतील बदल :** आदिवासींची भाषा बोलीभाषा आहे. तिला लिपी नाही. म्हणून त्यांच्या भाषांना लिपीबध्द करणे, त्यांचे लोकसाहित्य ग्रंथबध्द करणे असे प्रयत्न सुरू आहेत. मात्र प्रगत समाजाच्या संपर्कात येणारे आदिवासी प्रगत लोकांची भाषा शिकण्यावर बोलण्यावर भर देत आहेत.

**5) आदिम कलांचा ऱ्हास :** अनेक आदिवासी मूर्तिकला, चित्रकला, अलंकार बनविणे, गालिचे बनविणे, लाकडावरील कोरीव काम, इत्यादीमध्ये तरबेज आहेत. तथापि प्रगत लोकांना आदिवासींनी मोठ्या कष्टाने बनवलेल्या वस्तूंची कदर वाटत नाही.

**6) मनोरंजन साधनांतील बदल :** पूर्वी गोष्टी, सामूहिक नृत्य व गायन, कोडी घालणे, उखाणे, धार्मिक विधी, सणसमारंभ इ. द्वारे. आदिम समाजात मनोरंजनाचे कार्य होत असे. आज मात्र नागर समाजाच्या संपर्कातील आदिवासी मनोरंजनासाठी रेडिओ, दूरदर्शन, चित्रपट, व्हिडीओ अशा आधुनिक साधनांचा वापर करण्यावर अधिक भर देऊ लागले आहेत.

**7) आधुनिक वस्तुंचा वापर :** प्रगत समाजाच्या संपर्कातील आदिवासी चपला, बुट, चष्मा, घड्याळे, बॅटरी, नकली दागदागिने, इस्त्री, फॅन, रेडिओ, टी.व्ही. सेट, टेपरेकॉर्डर अशा आधुनिक वस्तू वापरू लागला आहे. पूर्वी पायी फिरणारा आदिवासी दुचाकीवर फिरतो आहे. मोटार रेल्वेतून प्रवास करतो आहे.

## भारतीय ग्रामीण समाजातील परिवर्तन :

**प्रास्ताविक :** कोणताही समाज नेहमी स्थिर असत नाही. त्यामध्ये सतत परिवर्तन होत असते. भारतीय समाज देखील याला अपवाद नाही. प्राचीन काळापासून भारतीय समाजात परिवर्तन होत राहिले आहे व आजही परिवर्तनाची प्रक्रिया चालूच आहे. ब्रिटिश राजवटीपासून भारतात सामाजिक परिवर्तनाला मोठ्या प्रमाणावर चालना मिळाली. ब्रिटिशांनी भारतात उद्योगधंदे सुरू केले. त्यातून भांडवलशाही अर्थव्यवस्थेचा उदय झाला. औद्योगिकीकरण व त्याच्याच जोडीने नागरीकरण वाढू लागले. उद्योगधंद्यांच्या वाढीसाठी व प्रशासकीय सोयीसाठी ब्रिटिशांनी दळणवळणाच्या प्रगत साधनांचे देशभ्र जाळे विणले. सार्वत्रिक शिक्षणाचा पुरस्कार करून शिक्षण प्रसाराला चालना दिली. शिक्षणामुळे भारतीयांना पाश्चिमात्य ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान व मूल्ये इत्यादींची ओळख झाली. त्यामुळे प्रभावित होऊन भारतीय समाजातील अनिष्ट गोष्टींचे उच्चाटन करण्यासाठी धार्मिक व सामाजिक क्षेत्रात चळवळी सुरू झाल्या. त्यामुळे भारतात सामाजिक परिर्तनाला चालना मिळाली.

### अ) आर्थिक क्षेत्रातील बदल :

परंपरागत ग्रामीण समाजाची आर्थिक स्वयंपूर्णता ब्रिटिश राजवटीत संपुष्टात आली. ब्रिटिशांनी मोठेमोठे उद्योगधंदे सुरू केल्याने खेड्यातील गृहोद्योग बंद पडले. ब्रिटिश सत्तेच्या शेतीविषयक धोरणामुळे शेती व्यवसायात दुरावस्था निर्माण झाली. त्यामुळे ग्रामीण आर्थिक क्षेत्रात हलाखीची स्थिती निर्माण झाली होती. त्यामुळे ग्रामीण आर्थिक जीवनात पुढीलप्रमाणे बदल घडून आले आहेत.

**1) शेतीव्यवसायातील बदल :** शेती हा ग्रामीण (आणि भारतीयही) अर्थव्यवस्थेचा कण आहे. शेतीचा विकास म्हणजे देशाचा विकास होय हे ओळखून शासनाने पंचवार्षिक

योजनांमध्ये शेती विकासाकडे विशेष लक्ष दिले. शेतीला कर्जपुरवठा, अनुदाने, कृत्रिम पाणीपुरवठा, आधुनिक उत्पादन तंत्र, शेतीमालाची विक्री व्यवस्था इत्यादी सोयीसुविधा पुरविल्या.

**2) बलुता पध्दतीचे उच्चाटन :** औद्योगिकीकरण, नागरीकरण, समतेचे तत्व, व्यवसाय स्वातंत्र्य, कनिष्ठ जातीत झालेला शिक्षण प्रसार, त्यामुळे निर्माण झालेली सामाजिक जाग्रती इत्यादी घटकांमुळे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा (आणि सामाजिक संबंधाचाही) आधार असलेल्या बलुता पध्दतीचे उच्चाटन होत आहे.

**3) औद्योगिक विकास :** शेती व्यवसायाबरोबरच ग्रामीण भागात उद्योगधंदे उभारण्यास शासनाने उत्तेजन व सवलती दिल्याने ग्रामीण भागात औद्योगिक विकासही कांही प्रमाणात होऊ लागला आहे.

**4) पूरक व्यवसायाचा स्वीकार :** ग्रामीण जनता आज पशुपालन, दुग्धव्यवसाय, कुक्कुटपालन, मधुमक्षिकापालन, रेशमी किड्यांची पैदास, विणकाम, हातमाग, विटकाम असे पूरक व्यवसाय वा जोडधंदे जातीपातीचा विचार न करता करू लागली आहे.

**5) शासकीय योजनांची अंमलबजावणी :** ग्रामीण जनतेच्या आर्थिक स्थितीत सुधारणा करण्यासाठी शासनाकडून समुदाय विकास योजना, एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, रोजगार हमी योजना, किमान गरजा कार्यक्रम व इतर योजना राबविल्या जात असल्याने ग्रामीण भागात रोजगाराच्या संधी वाढल्या आहेत.

**ब) सामाजिक क्षेत्रातील बदल :**

**1) कुटुंबसंस्थेतील बदल :** भारतीय ग्रामीण समाजात प्रचलित असलेल्या संयुक्त कुटुंबाचे आज मोठ्या प्रमाणावर विघटन होऊन तिच्या जागी विभक्त कुटुंब

स्थापण्याची प्रवृत्ती वाढली आहे. बदलत्या परिस्थितीत ग्रामीण कुटुंबाच्या रचनेत व कार्यात बदल झाले आहेत.

**2) विवाहसंस्थेतील बदल :** ग्रामीण विवाहसंस्थेतही बदल झाले आहेत. कायदेशीर प्रतिबंध आणि सामाजिक व शैक्षणिक जागृती यामुळे बालविवाहाचे संपूर्ण उच्चाटन झाले नसले तरी बालविवाहाचे प्रमाण घटत चालले आहे. पाळण्यातील तर राहोच पण दहा बारा वर्षांच्या मुला–मुलींचे विवाहही सहसा केले जात नाहीत. शिकणाऱ्या मुला–मुलींचे विवाहाचे वय वाढत आहे.

**3) जातिसंस्थेतील बदल :** परंपरागत ग्रामीण समाजावर असलेला जातिसंस्थेचा पगडा आज बराच कमी झाला आहे. जातीचे अनेक नियम शिथिल झाले आहेत. खाण्यापिण्याचे व सामाजिक संपर्काचे निर्बंध, शिवाशिव, स्पृश्यास्पृश्य, सोवळेओवळे यांचे पूर्वीइतके स्तोम माजविले जात नाही.

**4) स्त्रियांच्या दर्जात बदल :** परंपरागत ग्रामीण समाजात स्त्रियांचा दर्जा निम्न होता. आज तो पुरूषांच्या बरोबरीने उंचावला नसला तरी अनिष्ट रूढी परंपरांच्या बंधनातून स्त्रीची कांही प्रमाणात मुक्तता झाली आहे. विभक्त कुटुंबात पत्नीचे मत व आवड पतीकडून विचारात घेतली जाऊ लागली आहे.

**क) राजकीय क्षेत्रातील बदल :**

**1) राजकीय जागृती :** ब्रिटिश राज्यकर्त्यांनी सत्तेच्या केंद्रिकरणाचे धोरण स्वीकारून ग्रामपंचायतींचे अधिकार काढून घेतले. त्यामुळे ग्रामीण समाजाची राजकीय स्वायत्तता संपली. त्यामुळे ग्रामीण राजकीय जीवनात पोकळी निर्माण झाली.

**2) सत्ताप्राप्ती :** लोकशाही विकेंद्रीकरणाच्या तत्वाचा पुरस्कार करून ग्रामीण भागात पंचायत राज्यपध्दतीची सुरूवात झाली. गावपातळीवर ग्रामपंचायत, गट पातळीवर

पंचायत समिती व जिल्हा पातळीवर जिल्हा परिषद या प्रातिनिधी संस्था स्थापन झाल्या.

**3) नेतृत्वात बदल :** ग्रामीण नेतृत्वातही बदल झाला आहे. पाटील, कुलकर्णी, देशमुख, देशपांडे, इनामदार अशा परंपरागत नेतृत्वाच्या जागी सुशिक्षित, तरूण व लोकशाही पध्दतीचे नेतृत्व आले. मात्र हे नेतृत्व जातीयवाद, पैसा, प्रतिष्ठा व दहशत यावर पोसले जात आहे.

**ड) शिक्षण क्षेत्रातील बदल :**

**1) शिक्षण प्रसार :** परंपरागत ग्रामीण समाजात शिक्षणाचा हक्क केवळ उच्च जातींनाच विशेषतः ब्राह्मणांनाच होता आणि शिक्षणही मुख्यतः धार्मिक स्वरूपाचे असे. व्यावसायिक शिक्षण मुलांना कुटुंबातच मिळे. ब्रिटिश राजवटीत अनौपचारिक शिक्षण सुरू झाले. ब्रिटिश सत्तेने शिक्षण सर्वांना खुले केले.

**2) अनिष्ट प्रथांचे उच्चाटन :** शिक्षण प्रसारामुळे ग्रामीण जीवनात महत्वपूर्ण बदल घडून येत आहेत. शिक्षणामुळे ग्रामीण तरूणांना व स्त्रियांना विकासाचा मार्ग मोकळा झाला आहे.

**3) व्यक्तिवादाचा प्रभाव :** शिक्षणप्रसारामुळे कांही विपरित बदलही घडून आले आहेत. शिकलेली ग्रामीण पिढी व्यक्तिवादी बनत चालल्याने पूर्वीच्या सामूहिक जीवनाला तडे गेले आहेत. शिकलेला तरूण शेतीत राबण्यास नाखूष दिसतो. पांढरपेशीय व्यवसाय करून शहरात स्थायिक होण्याची इच्छा बाळगतो.

**4) व्यावसायिक शिक्षण :** शालेय शिक्षणाबरोबरच शेतकऱ्यांना बी–बियाणे, रासायनिक खते, लागवडीच्या नव्या पध्दती इत्यादींची माहिती देणे, महिलांना शिवणकाम,

बालसंगोपन यांचे प्रशिक्षण देणे अशा व्यावसायिक शिक्षणाच्या सुविधा पुरविल्या जातात. त्यामुळेही सामाजिक परिवर्तन घडून येण्यास चालना मिळत आहे.

**इ) धार्मिक क्षेत्रातील बदल :**

**1) धर्माचा प्रभाव कमी :** ग्रामीण समाजात धर्माला महत्वपूर्ण स्थान आहे. ग्रामीण जीवनाच्या सर्व अंगावर धर्माचा पगडा आहे. व्यक्तीचे वैयक्तिक व सार्वजनिक जीवन धर्माद्वारे नियंत्रित होते. आधुनिक काळात मात्र शिक्षणाच्या प्रसाराबरोबरच धर्माचे महत्व व प्रभाव कमी होत आहे.

**2) सामाजिक नियंत्रण :** सामाजिक नियंत्रणाचे साधन म्हणून धर्माला असलेले महत्व आज खूपच कमी झाले आहे. त्याऐवजी ऐच्छिक मंडळे व कायदा यांचे नियंत्रण प्रभावी ठरत आहे. पूर्वीच्या धार्मिक संस्थांचे हळूहळू उच्चाटन होऊन त्या जागी विविध ऐच्छिक मंडळे स्थपन होत आहेत.

**3) मानसिक सुरक्षा देण्यास असमर्थ :** बदलत्या आर्थिक–सामाजिक परिस्थितीतून निर्माण झालेल्या समस्यांची सोडवणूक करून व्यक्तीला मानसिक सुरक्षा किंवा मनःशांती मिळवून देण्यात धर्म असमर्थ ठरत आहे.

**फ) सांस्कृतिक क्षेत्रातील बदल :**

**1) वेशभूषा व केशभूषा यातील बदल :** नागरिकरणाच्या प्रभावामुळे ग्रामीण लोकांच्या वेशभूषेत व केशभूषेत बदल झाले आहेत. धोतर, बंडी, फेटा यांच्याजागी विजार किंवा पँट, बुशशर्ट, टोपी आणि नऊवारी साडी चोळी यांच्या जागी सहावारी साडी व ब्लाऊज असा बदल दिसून येतो.

**2) खाण्यापिण्याच्या पध्दतीत बदल :** जातीचे खाण्यापिण्याबाबतचे निर्बंध खूपच शिथिल झाले आहेत. जमिनीवर किंवा पाटावर बसून पत्रावळीवर किंवा तांब्या पितळेच्या भांड्यातून जेवण्याची प्रथा मागे पडली आहे.

**3) निवासस्थानाच्या स्वरूपातील बदल :** पूर्वीसारखी धाब्याची किंवा उतरत्या छपराची घरे न बांधता सिमेंट काँक्रिटची छोटी, टुमदार, आकर्षक व सर्व सोयींनी युक्त (संडास, बाथरूम, नळ, वीज इ.) अशी घरे बांधण्यावर भर दिला जात आहे.

**4) भाषेतील बदल :** शिक्षण प्रसार व नागरी जीवनाशी येणारा संपर्क यामुळे ग्रामीण लोकांच्या भाषा बोलण्याच्या पध्दतीत (उच्चारण पध्दतीत) शुध्दता येऊ लागली आहे.

**5) ग्रामीण कलेतील बदल :** ग्रामीण कला जीवनाभिमुख आहे. ग्रामीण समाज जीवनाचे प्रतिबिंब ग्रामीण लोकांच्या लोककथा, लोकगीते, कोरीवकाम, शिल्पकला इत्यादींमध्ये पडलेले असते. महत्वाचे म्हणजे ग्रामीण कलेची निर्मिती वैयक्तिक नसून सामुदायिक असते. तथापि परिवर्तनाच्या लाटेत ग्रामीण कला सापडली आहे.

**6) मनोरंजनातील बदल :** ग्रामीण समाजात पूर्वी तमासगीर, गोंधळी, किर्तनकार, बहुरूपी, शारीरिक ताकदीचे व कसरतीचे प्रयोग करणारे पैलवान, डोंबारी, नंदीवाले, माकडवाले, गारूडी, कोल्हाटी इत्यादी कलाकारांना मनोरंजनाच्या दृष्टीने खूपच महत्व होते.

**7) दळणवळणाच्या साधनांतील बदल :** पूर्वी सामान्य खेडूत पायीच प्रवास करी तर श्रीमंत लोक घोडागाडी, बैलगाडी अशी साधने वापरत. आज खेड्यापाड्यातही रस्ते काढल्याने सायकल, मोटारसायकल, जीप, मोटार, रेल्वे ही प्रगत वाहतूक साधने ग्रामीण लोक प्रवासासाठी वापरू लागले आहेत.

## नागरीकरण

**प्रास्ताविक :** मानव समाजात प्राचीन काळापासून शहरे किंवा नगरे आढळतात. तथापि नागरीकरण ही आधुनिक प्रक्रिया आहे. पाश्चात्य समाजात औद्योगिक क्रांतीनंतर नागरीकरणास सुरूवात झाली आणि त्यानंतर त्याचे लोण इतर समाजातही पोहोचले. आज नागरीकरण ही सार्वत्रिक व अनिवार्य अशी प्रक्रिया बनली आहे.

**नागरीकरणाच्या व्याख्या :**

**1) प्रा.चंद्रकांत खंडागळे :** नागरी पर्यावरणाने प्रभावित होऊन सभोवतालच्या भागातील विशेषतः ग्रामीण भागातील लोक जेंव्हा नगरांकडे स्थलांतर करतात व नागर समाजातील व्यवसाय व जीवनशैली यांचा स्वीकार करतात तेव्हा त्या प्रक्रियेस नागरीकरण असे म्हणतात.

**2) डब्ल्यू.एस.थाँपसन :** कृषी व्यवसायाशी संबंधित असलेल्या लहान समाजातील लोकसंख्या जेव्हा प्रामुख्याने व्यापार, उद्योग, शासकीय व्यवहार चालत असलेल्या मोठ्या समाजाकडे स्थलांतरित होत असेल तर त्या प्रक्रियेस नागरीकरण असे म्हणतात.

**3) संयुक्त राष्ट्रसंघाच्या** एका अहवालानुसार 'ज्या प्रक्रियेद्वारे लोकसंख्या एका निश्चित व निर्धारित आकाराच्या समुहाकडून मोठ्या आकारांच्या समूहाकडे एकत्रित होत असते त्या प्रक्रियेस नागरीकरण म्हणतात.

**भारतातील नागरीकरणाची प्रक्रिया :**

भारतातही प्राचीन काळापासून नगरे अस्तित्वात असली तरी नागरीकरणाची प्रक्रिया मात्र ब्रिटिश राजवटीत सुरू झाली आणि स्वातंत्र्योत्तर काळात तिची गती

वाढत चालली आहे. ब्रिटिश राजवटीत आणि स्वातंत्र्योत्तर काळातही शहरी ही मोठमोठ्या उद्योगाची, शासकीय कार्याची, व्यापाराची, शिक्षणाची, लष्करी यंत्रणेची व पर्यटनाची केंद्रे बनली. औद्योगिकीकरणामुळे खेड्यातील घरगुती उद्योगधंदे बुडाले. ग्रामीण कारागीर बेकार बनले. त्यातच लोकसंख्या वाढू लागली. वाढत्या लोकसंख्येच्या गरजा शेतीद्वारे भागेनाशा झाल्या. परिणामी ग्रामीण लोक रोजगार, व्यापार, शिक्षण इत्यादीच्या उद्‌देशाने शहराकडे स्थलांतर करू लागले.

**नागरीकरणामुळे निर्माण झालेल्या समस्या :**

भारतात नागरीकरणाची गती मंद असली तरी त्यामुळे पुढील कांही गंभीर समस्या निर्माण झाल्या आहेत.

**1) निवासाची समस्या :** नागरीकरणामुळे शहरात राहत्या जागेची समस्या निर्माण झाली आहे. शहरात मर्यादित जागेत लाखो लोक दाटीवाटीने घरे बांधून रहातात. शहरातील बहुतांशी जागा ही कार्यालये, उद्योगधंदे, दुकाने, शाळा, बँका, वाहनतळ, बागा क्रीडांगणे, रस्ते, लोहमार्ग इत्यादींनी व्यापलेली असते.

**2) बेकरी :** नागरीकरणामुळे शहरात बेकारीची समस्याही गंभीर बनलेली आहे. ग्रामीण लोक प्रामुख्याने शहरात रोजगारासाठी स्थलांतर करतात. त्यापैकी सर्वांनाच रोजगार मिळतो असे नाही आणि ज्यांना मिळतो त्यांनाही पूर्ण रोजगार मिळत नाही. शहरात शिक्षण घेणाऱ्यांची संख्या अधिक असते. पण सर्वच सुशिक्षितांना रोजगार मिळतो असे नाही.

**3) गुन्हेगारी :** नागरीकरणामुळे गुन्हेगारीचे प्रमाण प्रचंड वाढले आहे. शहरात असंख्य लोक असतात. ते परस्परांना ओळखत नसतात. त्यांच्यातील संबंध केवळ औपचारिक

व करारात्मक असतात. कुटुंब, आप्तसंबंध, धार्मिक व नैतिक मूल्ये इत्यादींचे नियंत्रण खूपच शिथील असते.

**4) भिक्षावृत्ती :** नागरीकरणामुळे भिक्षावृत्ती (भीक मागणे) वाढत जाऊन शहरात भिकाऱ्यांची संख्या वाढत जाते. शहरातील बेकार लोक विशेषतः वृध्द स्त्रीपुरूष, लहान मुले, अपंग, रोगी, अनाथ, निराधार इ. लोक भीक मागण्याचा व्यवसाय करतात.

**5) व्यसनाधिनता :** नागरी पर्यावरण मोहमय असते. ते व्यक्तीला भोगवादी, चंगळवादी बनविते. शिवाय ते अनेक शारीरिक व मानसिक ताणतणाव निर्माण करते. परिणामी अनेक शहरी लोक चैनीसाठी, ताणतणाव विसरण्यासाठी मद्यपान करतात. अफू, गांजा, चरस, गर्द इत्यादी मादक पदार्थांचे सेवन करतात आणि त्यांना त्याची चटक लागून पुढे ते व्यसनाधिन होतात.

**6) वेश्या व्यवसाय व एड्स :** नागरीकरणामुळे वेश्या व्यवसायाची वाढ व एड्स रोगाचा फैलाव होण्यास चालना मिळाली आहे. प्राचीन काळापासून शहरांमध्ये वेश्या व्यवसाय आढळतो. लैंगिक सुखाची आसक्ती, वैवाहिक जीवनातील अतृप्ती, लैंगिक सुखाची पहिली अनुभूती घेणे इ. कारणामुळे पुरूष वेश्यागमन करतात.

**7) वाहतुकीची समस्या :** नागरीकरणामुळे वाहतुकीची समस्या निर्माण झाली आहे. नागरीकरणामुळे शहरी लोकसंख्येत वाढ होऊन शहरांचा आकारही वाढत जातो. नगराला लागून उपनगरे तयार होतात. कामाचे ठिकाण, बाजार, शिक्षणसंस्था इ. पासून लोक दूर राहतात. त्यामुळे अंतर्गत वाहतुकीसाठी सायकल, मोटार सायकल, रिक्षा, बस, स्थानिक रेल्वे अशा साधनांचा वापर अनिवार्य ठरतो.

**8) प्रदूषण :** नागरीकरणामुळे प्रदूषणाची समस्याही तीव्र बनली आहे. शहरातील कारखान्यांतून धूर, धूळ, राख, काजळी, कार्बन व अनेक विषारी वायू हवेत मिसळतात. पेट्रोल–डिझेलवर चालणाऱ्या वाहनातून शिसे, धूर व धूरके, कार्बन डायॉक्साईड, कार्बन मोनॉक्साईड, नायट्रोजन ऑक्साईड इ. विषारी वायू हवेत मिसळतात. तसेच रस्त्यावर कचऱ्याचे प्रचंड ढीग साठतात. हा कचरा कुजून त्यात जंतू व विषारी घटक तयार होतात व ते हवेत मिसळतात. अशाप्रकारे हवेचे प्रदूषण होते.

**9) वृध्दांची समस्या :** नागरीकरणामुळे शहरात संयुक्त कुटुंबांच्या जागी पती, पत्नी व अविवाहित मुले एवढेच सदस्य असलेले विभक्त कुटुंब अनेक दृष्टीने सोयीचे ठरत आहे. व्यक्तीवाद, राहत्या जागेची टंचाई, उच्च जीवनमानाची अपेक्षा, स्त्रीचे नोकरी करणे इ. मुळे कुटुंबाचा आकार लहान ठेवणे सोयीचे वाटते. म्हणून कुटुंबात म्हातारे आई–वडील व इतर नातेवाईक अडचणीचे ठरत आहेत.

**10) वैफल्य व आत्महत्या :** नागरीकरणाच्या प्रक्रियेत व्यक्ती नोकरी, पैसा, उच्च जीवनमान, करिअर घडविणे इ. त्या अपेक्षेने शहरांकडे ओढली जाते. तेथे आल्यानंतर तिला सुख व संपत्ती मिळविण्यासाठी सतत धडपडावे लागते. प्रचंड धडपड करूनही आपल्या अपेक्षांची पूर्तता न झाल्यास ती वैफल्यग्रस्त बनते. तिला अनेक शारीरिक व मानसिक व्याधी जडतात.